ISSN 2231-5063 Impact Factor : 4.6052 (UIF) Volume - 6 | Issue - 1 | July - 2016

Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal
RNI : MAHMUL/2011/38887
ISSN No: 2231-5063
Impact Factor 2.2052 (UIF) [Yr. 2014]
3.4052 (UIF) [Yr. 2015]
4.6052 (UIF) [Yr. 2016]

GRT
Golden Research Thoughts

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार

**श्री. श्रीकांत जे. होटकर**
संशोधन अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थी, बार्टी, पुणे.
अर्थशास्त्र संशोधन केंद्र , संतोष भीमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप.

**सारांश :-**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजशास्त्र, राज्यशास्त्र, नितीशास्त्र, मानवंश शास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र अशा कितीतरी शास्त्रात आणि विषयात अतिशय निष्णांत असे एक अत्यंत बुध्दीमान, असामान्य असे महान व्यक्तीमत्व होते. ज्यांनी आपल्या प्रखर बुध्दीमत्तेतून, सखोल अभ्यासातून आणि संशोधनातून अनेक विषयावर वेळोवेळी अत्यंत महत्त्वपूर्ण व उपयुक्त विचार मांडले आहेत. डॉ. बाबासाहेब हे जसे प्रकांड कायदे पंडीत होते तसेच ते जागतिक दर्जाचे थोर अर्थतज्ञ होते. अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक, तत्वज्ञ आणि बुध्दीमान प्रतिभासंपन्न असे प्राध्यापक होते. त्यामुळे त्यांनी



मांडलेले आर्थिक विचार आणि शेतीविषयक विचार हे अतिशय महत्त्वपूर्ण व आपल्या देशाला आर्थिक संपन्नता मिळवून देणारे आणि देशाचा आर्थिक कणा मजबुत करुन आर्थिक दृष्टया सक्षम करणारे आहेत. एवढेच काय पण आपल्या देशाच्या आर्थिक क्षेत्रात जागतिक स्तरावर प्रगतीकडे नेणारे होते. आजचे आपले शासनकर्ते आपल्या देशाला महासत्ता बनविण्याचे वारंवार बोलत आहेत असा महासत्ता भारत तेंव्हाच जर डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे विचार स्विकारुन त्याची योग्य अंमलबजावणी केली असती तर झाला असता आणि आपल्या देश आर्थिकदृष्टया आजच्या पेक्षा कितीतरी अधिकपटीने बलशाली, सामर्थ्यशाली व विकसीत देश बनला असता. भारतीय समाजात राजकीय समतेबरोबरच आर्थिक समता खऱ्या अर्थाने प्रस्थापित झाली असती.

**प्रस्तावना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही एकमेव अशी प्रतिभासंपन्न व प्रचंड बुध्दिमान व्यक्ती होती ज्यांनी केवळ आपल्या वयाच्या पंचविसाव्या वर्षी अतिशय महत्त्वपूर्ण अशा अर्थशास्त्र या विषयाचा अमेरिका, इंग्लंड सारख्या परदेशातील विश्व विद्यापीठात शिकत असतांना सखोल अभ्यास करुन व चिकित्सक संशोधन करुन १९१५ साली कोलंबिया विद्यापिठात एम. ए. ची पदवी संपादन केली. त्यानंतर पुढे केवळ दोन वर्षांनंतरच १९१७ साली त्याच कोलंबिया विद्यापीठाने डॉ. बाबासाहेबांना अर्थशास्त्रात "दी नॅशनल डिव्हीडंट ऑफ इंडिया - हिस्टॉरिकल ॲण्ड अॅनॅलिटिकल स्टडी" या विषयातील प्रबंधासाठी पीएच. डी. ही पदवी सन्मान पूर्वक बहाल केली. त्याच्याही पुढे जावून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२३ मध्ये लंडन येथील लंडन स्कूल ऑफ इकॉनामिक्स येथून 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही अतिशय महत्त्वपूर्ण व उच्चकोटीची पदवी संपादन कली ती देखिल अर्थशास्त्र या विषयातच. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या तीनही अतिशय महत्त्वाच्या व सर्वोच्च पदव्या या अर्थशास्त्र विषयावर आपले महत्त्वपूर्ण योगदान देवून मिळविल्या. या पदव्या संपादन करताना डॉ. बाबासाहेबांनी लिखानासाठी जे विषय घेतले ते ही संपूर्णपणे आर्थिक, आर्थिक समस्या व आर्थिक प्रश्नांशी संबंधित असून त्यावरं प्रकाश टाकणारे होते. त्यातील 'ॲडमिनिस्ट्रेश्न अँड फायनान्स ऑफ दी ईस्ट इंडिया कंपनी' या १९१५ साली एम.ए. साठी लिहिलेल्या पहिल्याच शोध प्रबंधात डॉ. बाबासाहेबांनी ब्रिटिशानी भारतीयावर केलेल्या अन्याय व शोषण याचे अभ्यास पूर्ण सविस्तर असे वर्णन केले होते. तर सन १९१७ साली 'दी इव्हॅल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटीश इंडीया' हा प्रबंध ए.एस्सी. (अर्थशास्त्र) साठी लिहिला होता. त्यात ब्रिटीश केंद्र सरकार आणि त्यावेळीची घटक राज्य यांच्यातील आर्थिक संबंधाचे वर्णन केले होते. तर 'डॉक्टर ऑफ सायन्स' या अत्यंत मौलिक पदविसाठी १९२३ साली डॉ. बाबाससहेबांनी 'दी प्रोब्लेम ऑफ रुपी-इट ओरीजन अॅन्ड इट्स सोल्युशन' हा शोध प्रबंध लिहिला ज्यात भारतीय रुपाच्या उत्क्रांतीची ऐतिहासिक मिमांसा करताना भारतासाठी आदर्श चलन पद्धत कोणती ? या ज्वलंत व महत्वपूर्ण विषयावर सखोल विचार मांडले होते.

या तीनही शोधप्रबंधाचा जर आपण विचार केला तर आपल्या असे लक्षात येथे की, डॉ. बाबासाहेब ओबेडकरांनी अगदी सुरुवातीपासूनच म्हणजे उच्च शिक्षण घेण्याच्या प्रक्रियेपासूनच अर्थशास्त्रीय लिखाण व संशोधनाला सुरुवात करुन अतिशय महत्वपूर्ण असे आर्थिक विषय, आर्थिक समस्या, उपाय अशा अनेक महत्वपूर्ण बाबी त्यांनी उपस्थित करुन आपले द्रष्टेपण सिद्ध केले होते. त्यांच्या या लिखाणास कमालीच्या तत्वज्ञानांची जोड लाभलेली आहे. डॉ.बाबासाहेबांना अगदी सुरुवातीपासून जशी राजकीय व सामाजीक क्षेत्रात समानता अपेक्षित होती अगदी तशीच समानता त्यांना आर्थिक क्षेत्रात ही अपेक्षित होती. समाजातील कोणत्याच

घटकाची आर्थिक पिळवणूक होऊ नये असा त्यांचा नेहमी कटाक्ष असे. म्हणूनच त्यांच्या अर्थशास्त्रीय लिखाणाचा, विचारांचा केंद्रबिंदू हा समाजातील सर्वसामान्य माणूस होता. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अमेरिका, इंग्लंड या देशात शिक्षण घेत असतानांच अर्थशास्त्र या विषयावर शोधप्रबंध व त्याचेच पुढे ग्रथांत रुपांतर करताना अतिशय महत्वपूर्ण असे अर्थविषयक विचार मांडले आहेत. त्यांनी सांगितलेले अर्थशास्त्रीय विचार किती महत्वपूर्ण, मौल्यवान व वैशिष्ट्यपूर्ण आहेत हे सांगताना डॉ. बाबासाहेबांना अर्थशास्त्र शिकवणारे त्यांचे आवडते प्राध्यापक सेलिग्मन डॉ. बाबासाहेबांनी लिहलेल्या "भारतीय नफ्यांचा वाटा एक ऐतिहासिक प्रथ्थककरण (परिशिलन)" या ग्रंथाच्या प्रस्तावनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अगदी मुक्तकंठाने कौतूक व प्रशंसा करताना म्हणतात की, "आंबेडकरांनी हाताळलेला प्रश्न जगातील विचारवंताच्या चर्चेतिल एक महत्वाचा विषय असून या विषयाचा इतका सखोल आणि सांगोपांग अभ्यास कोणी केल्याचे माहित नाही." प्रो.सेलिग्मनच्या या विधानावरुन हेच स्पष्ट होते की, डॉ. बाबासाहेबांनी भारताच्या आर्थिक प्रश्नावर जे काही विचार मांडले आहेत ते अतिशय अभ्यासपूर्वक व महत्वपूर्ण असून ते डॉ. बाबासाहेब हे एक फार मोठे जागतिक दर्जाचे प्रतिभासंपन्न अर्थतज्ञ होते हेच सिध्द होते.

डॉ. बाबासाहेब केवळ अर्थशास्त्र या विषयाचा सखोल व सविंस्तर असा अभ्यास करुन आणि त्या विषयातील सर्वोच्च अशा पदव्या घेऊनच थांबले नाहीत. त्यांनी अर्थशास्त्रीयचिंतन व चिकित्सा करुन महत्वपूर्ण असे विचार मांडले आणि तत्कालीन शासनामध्ये प्रतिनिधी असतांना वेळोवेळी प्रत्यक्षपणे प्रभावीअसे कार्य देखिल केले आहे. आपल्या देशातील सुमारे ८०% लोकसंख्या ही खेडयात, ग्रामीण भागात राहत असल्याने आणि त्यांचा प्रमुख व्यवसाय हा शेती असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविशयक, शेतीविंषयक व कामगार विषयक विचार हे आपल्या देशाला आणि आपल्या देशातील शेतकरी, शेतमजूर च कामगारांना आर्थिक दृष्टया सक्षम करणारे आणि त्यांना फार मोठा दिलासा देणारे होते. त्यांचे दू:ख व यातना कमी करणारे होते. कारण बाबासाहेबांना हे चांगले ज्ञात होते की, ज्या राष्ट्राची शेती उत्तम असते त्या राष्ट्राचा सर्वांगिण विकास फार मोठ्या प्रमाणात होत असतो. म्हणून शेतकऱ्यांना शेतह अधुनिक पद्धतीने करता यावी यासाठी राष्ट्रीय शेतीचा विचार मांडला व सरकारनेच शेतीत गुंतवणूक करुन शेतकऱ्यांना सुलभ पतपुरवठा करावा. शेतीसाठी लागणारी सर्व साधनसामग्री शेतकऱ्यांना पुरवावी. गरीब होतकरु, कष्टकरी, शेतकरी व शेतमजूर यांना लाभ मिळेल, त्यांचा फायदा होईल अशा तऱ्हेने जमिनीचे फेरवाटप करावे. शेती उत्पादन वाढीसाठी सरकारने भागभांडवल गुंतवावे जेणे करुन ग्रामीण भागातील गरीब मध्यमवर्गीय शेतकरी सुध्दा चांगल्या प्रकारे शेती करुन, शेतीतील उत्पादन वाढवून चांगल्या प्रकारे जीवन जगू शकेल. अशा कितीतरी शेतकऱ्यांच्या हिताच्या गोष्टी सांगितल्या. त्याच बरोबर उद्योगधंदे हे सरकारच्या मालकीचे असावेत असा महत्वपूर्ण विचार मांडला. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नियोजन बध्द अर्थव्यवस्था अपेक्षित होती.

यांच्याही पुढे जावून डॉ. बाबासाहेबांना या देशातील शेतकऱ्यांच्या दैनंदिन जिव्हाळयाच्या ज्या समस्या आहेत जे प्रश्न व यातना आहेत याची जाणीव किती प्रखरपणे होती, त्यांच्या प्रति किती जिव्हाळा व आत्मीयता होती हे डॉ. बाबासाहेबांच्या चिपळून येथील शेतकऱ्यांच्या समस्यावर केलेल्या अध्यक्षिय भाषणावरुन आपल्या लक्षत येते. या परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की ,"माझा जन्म सर्वसाधारण जनतेची जबाबदारी (काळजी) घेण्यासाठी असावा मी एका गरीब कुटुंबात जन्माला आलो आणि मुंबईच्या इंप्रुव्हमेंट ट्रस्ट चाळीत गरीब लोकांत वाढलो. मला तुमची गाऱ्हाणी समस्या माहीत आहेत. खोती तुमच्या रक्ताचे शोषण करीत आहे. ही खोतीची पध्दत नष्ट केलीच पाहीजे. तसे केले तर तुम्हाला शांतता व समृध्दी लाभेल. तुमचे ध्येय गाठण्यासाठी ही चळवळ तुम्ही अशीच चालु ठेवली पाहीजे." अशा प्रकारे डॉ. बाबासाहेबांनी शेतकऱ्यांच्या अन्यायाला व शोषणाला वाचा फोडली व याच भाषणातून शेतकऱ्यांना एक अतिशय मोलाचा संदेश व उपदेश केला, तो असा की, "चार पाच वर्षानीभारताच्या हाती आपल्या भवितव्याची सर्व सुत्रे मिळण्याचा संभव आहे. त्यावेळी तुम्ही तुमचे खरे प्रतिनिधी विधीमंडळावर पाठविण्याची दक्षता घ्या, जे उमेदवार खोती पध्दतीचा नायनाट करण्यास निष्टेने झटतील अशानाच तुम्ही निवडून दया ."

एकंदरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा खोती पध्दतीला कडाडून विरोध तर होताच पण समस्याग्रस्त शेतकऱ्यांप्रती अत्यंत जिव्हाळा होता. कारण खोती पध्दतीमुळे गरीब मध्यमवर्गीय शेतकरी अर्थिक दृष्टया फारच भरडला गेला होता. त्याची सांपत्तीक स्थिती फारच वाईट होती. कारण जमीनदार खोत जे केवळ शेतकऱ्यांचीच पिळवणूक करीत नव्हते तर त्यांच्या बरोबर त्या शेतकऱ्यांच्या बायका मुलांचीही पिळवणूक होत असे. ही पिळवणूक एवढी भयानक होती की, साधे त्यांच्या पोटापाण्या पुरती मजूरी त्यांना मिळत नसे. अशा या रक्तपिपासू पिळवणुकीने व शोषणामुळे शेतकऱ्यांच्या मूलांचे भवितव्य ही अंधारमय होते. त्यांना शिक्षण मिळु नये यासाठी खोत जमिनदार प्रयत्नशिल असत. कारण असे करण्यात त्यांचा स्वार्थ पडलेला असे. अशी अत्यंत वाईट खोतीची पध्दत नष्ट करणे डॉ. बाबासाहेबांना अत्यावश्यक वाटत होते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्याच्या समस्या सोडवण्यासाठी व त्यांचे कल्याण साधण्यासाठी १७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबई विधिमंडळासमोर खोती पध्दती नष्ट करण्यासाठी एक विधेयक मांडले. अशा प्रकारे खोतीपध्दत नष्ट व्हावी, शेतजमिन करणाऱ्या कुळांची गुलामगिरी नष्ट व्हावी म्हणून अशा प्रकारचे विधेयक विधिमंडळात मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव व पहिलेच सदस्य होते हे विशेष.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय शेतीव्यवस्था तिच्या समस्या, तिची अवस्था यासंबंधी विचार मांडले आहेत. १९१८ मध्ये 'The journal of Indian Economic Society' च्या अंकात Small Holdings in India and their Remedies हा लेख प्रसिध्द झाला. या लेखात डॉ. आंबेडकरांनी भारताच्या दृष्टीने शेती हा एक महान राष्ट्रीय उद्योग आहे, सर्व प्राथमिक व्यवसायामध्ये शेतीचे महत्त्व सर्वाधिक असल्याचे म्हटले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचा विकास झाल्याशिवाय सुधारणा होणार नाही. परंतु भारतीय शेतीची उत्पादकता फार कमी आहे असे त्यांचे मत आहे. तसेच त्यांच्या मते शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक म्हणजे शेतीच्या धारण क्षेत्राचा आकार आहे. शेतजमिनीचा आकार लहान असल्याने शेतीच्या उत्पादकतेत वाढ होत नाही. भारतात शेती जमिनीचा आकार लहान आहेच, तसेच ती वेगवेगळया ठिकाणी विखुरलेली आहे. याचाच अर्थ शेतीचे विभाजन व तुकडीकरणामुळे शेतीची उत्पादकता कमी आहे. परंतु जमिनीचे उत्पादकता वाढविण्या करिता केवळ जमिनीचे एकत्रीकरण करुन चालणार नाही तर त्याचा आकार वाढवून किफायतशीर करणे गरजेचे आहे. तसेच डॉ. आंबेडकरांच्या मते जमिनीचा तुकडा किफातशीर आहे की नाही ही गोष्ट त्या जमिनीच्या आकारावर अवलंबून नसून तेथे शेतीसाठी आवश्यक असणारे इतर उत्पादन घटक किती प्रमाणात उपलब्ध आहेत यावर अवलंबून आहे. यावरुन शेतजमिनीची उत्पादकता वाढविण्याचा खरा उपाय धारण क्षेत्राच्या आकारात वाढ करणे हा नसून त्या जमिनीवर भांडवल व इतर उत्पादनाच्या घटकात वाढ करणे होय. तसेच त्यांनी रशियाप्रमाणे सामूहिक शेती पध्दतीचा स्वीकार केल्यास उत्पादकता आणि कार्यक्षमता वाढून शेतीत पर्यायाने ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास होऊ शकतो. शेतीच्या प्रगतीसाठी भूविकास बँका, शेतकऱ्यांच्या पतपेढ्या, खरेदी विक्री मंडळे स्थापन करावीत की जेणे करुन शेतकऱ्यांना भांडवलाचा पुरवठा आवश्यकतेनूसार योग्य प्रमाणात होईल तसेच शेतकऱ्यांनाच्या शेतमालास योग्यतो भाव मिळण्यास मदत होऊ शकेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, ज्या सेवा सुविधा औद्योगिक कामगारांना मिळतात त्याच सेवा-सुविधा शेतमजुरांना देखील मिळाल्या पाहिजेत, ज्यामुळे खेड्यातील लाखो शेतमजुरांची स्थितीत सुधारण होईल.

शेतकऱ्यांचे संरक्षण व्हावे अशा प्रकारचे मूलभूत कायदे त्यांनी केले आणि शेतकऱ्याचे प्रश्न, दु:ख आणि यातना कमी करुन त्यांना फार मोठा दिलासा दिला. खरे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेतकऱ्यांच्या सुधारण्याच्या बाबतीतील संपूर्ण विचारांना जर राज्यकर्त्यांनी वेळोवेळी स्विकृत केले असते तर आज या देशातील शेतकरी समस्याग्रस्त व वैफल्यग्रस्त राहिला नसता. याउलट तो संपूर्णपणे सुखी व समाधानी राहिला असता.

भारतामध्ये समतेवर आधारित अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था स्थापन व्हावी असे त्यांना वाटत होते. त्यांनी राज्य समाजवदाचा (State Socilism) पुरस्कार केला. समाजवादाचा पुरस्कार करताना त्यांनी लोकशाही मूल्याचा बळी जाऊ नये अशी अपेक्षा व्यक्त केली.

आजही जर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकरी, शेतमजूर व कामगारांच्या बाबतीत जे काही महत्वपूर्ण विचार मांडले आहेत ते स्विकारुन त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी केली तर महाराष्ट्रातील व देशातील शेतकरी नैराशेच्या गेंतेतून बाहेर आल्याशिवाय राहणार नाहीत. शेतकरी कर्जबाजारी होणार नाहीत आणि नैराश्यापोटी आत्महत्याही करणार नाहीत. त्यामुळे राज्यकर्त्यानी थोर अर्थतज्ञ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी निर्देशित केलेले आर्थिक विचार प्रत्यक्षात कृतीत आणून खऱ्या अर्थाने देशात आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### संदर्भ सूची

१. Dr. B. R. Ambedkar, “Small Holding in India and their remedies”, Government of Maharashtra Publication, Dr. Babasaheb Ambedkar writings and speeches, Vol. I, 1989.
२. Dr. B. R. Ambedkar, “State and Minorities”, Gov. of Maharashtra Publication, Dr. Babasaheb Ambedkar writings and speeches, Vol. I, 1989.
३. डॉ. वा. ना. कुबेर, "डॉ. आंबेडकर : विचार मंथन", लोकवाड्मय गृह (प्रा.) लि. मुंबई, १९८२.
४. धनंजय किर, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र", मुंबई.
५. डॉ. विजय कविमंडन, "डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार", श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, २०१३.
६. प्रा. ए. आर. रायखेलकर, "आर्थिक विचारांचा इतिहास", विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.